(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# 'ऋतुरंग' मधील 'रात्ररंग'

**सौ योगिता अरविंद राजकर, संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर.**

**ई मेल yogitarajkar 101 @gmail.com**

---

**प्रास्ताविक**

संध्याकाळच्या हुरहुरत्या कातरवेळेकडून गडद अंधारकडे रात्र अलवार सरकत जाते.आभाळात नक्षत्रांच्या राशी चमचमू लागतात .हळूहळू रात्र चढत जाते.रात्र कधी गूढ रंग घेऊन येते.कधी सुखदुःखाच्या जाणिवांनी रंगत जाते .ती कधी सुखावते तर कधी भयकंपित करते.सुखदुःखाच्या रात्रीपलीकडे अनेक रुपात रात्र झुलवत राहते .कडू-गोड वास्तव, जीवन प्रवास,जंगलातील रात्र,सौंदर्यदर्शन देणारी रात्र,कष्टमय रात्र,स्वप्नांची रात्र अशा कितीतरी अवस्थांमधून रात्र बहरत असते.

रात्रीच्या या विविध चेहऱ्यांचे आकर्षण 'ऋतुरंग' दिवाळी अंकाचे संपादक अरुण शेवते यांना वाटले.म्हणून 'ऋतुरंग ' चा २००१ चा खास 'रात्र' विशेषांक त्यांनी प्रकाशित केला .प्रा.रणधीर शिंदे म्हणतात "कवी,प्रकाशक आणि संपादक म्हणून परिचित असणाऱ्या अरुण शेवते गेली तीन दशके 'ऋतुरंग'हा दिवाळी अंक प्रसिद्ध करत आहेत.अतिशय आगळावेगळा आणि विशिष्ठ विषयसूत्री दिवाळी अंक काढणे ही त्यांची खासीयत. मराठी लेखनपरंपरा संपन्न करणारे आणि जीवनानुभवाच्या कक्षा विस्तृत करणारे हे अंक आहेत..त्यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील लेखकांचे तसेच लेखक नसणाऱ्यांचे ते सहाय्य घेतात ."१ सन १९९३ पासून विशिष्ट विषयाला वाहिलेला दिवाळी अंक अरुण शेवते काढत आहेत .रात्रीच्या अनोख्या अनुभवांचे विविधरूपी दर्शन 'रात्र' विशेषांकातून घडवले आहे .प्रस्तुत शोधनिबंधात 'ऋतुरंग'मधील रात्र विशेषांकतील रात्रींच्याअनुभवांचा धांडोळा घेतला आहे.

**कलावंतांच्या 'रंगल्या रात्री '**

प्रत्येकजण दिवस रात्रीच्या फेऱ्यामधून जात असतो .प्रत्येक रात्रीचा चेहरा वेगवेगळा असतो .काही रात्री मनात रुणझुणत राहतात तर काही टोचत राहतात. कधी त्या जगण्याचे वास्तवभान देतात तर कधी रात्रीच्या जगाचे नैसर्गिक नाद मनास भिडतात .सर्वसामान्यांपेक्षा कलावंतांच्या रात्री वेगळ्या असतात .'रात्र' हेच कलावंतांचे आयुष्य असते.अशा कलावंतांच्या रात्रीचे आत्मकथन या विशेषांकात उलगडले आहे .तमाशा कलावंत यमुनाबाई वाईकर,विठाबाई नारायणगावकर,सुलोचना चव्हाण,सुरेखा पुणेकर,माया जाधव,काळू-बाळू यांनी आपल्या जगण्याची चित्तरकथा प्रांजळपणे वाचकांपुढे मांडली आहे .कलावंत म्हणून झालेली जडणघडण, संघर्षाचे दिवस यमुनाबाई वाईकर यांनी आठवणीमधून चितारले आहेत .घाट आणि मंदिरांनी समृद्ध दक्षिणकाशी वाईमध्ये छोट्या वस्तीत कोल्हाटी समाजात त्या राहत .अत्यंत हलाखीची परिस्थिती आणि बालपणी लागलेली गाणी म्हणण्याची आवड त्यांनी जोपासली .मुंबईला मावसभावाकडे त्या लिहायला-वाचायला,नाचणे -गाणे,लावणी इत्यादी शिकल्या.पुढे वडिलांनी तमाशा काढल्यानंतर गावोगावी खेळ करत,बिकट प्रसंगांना तोंड देत खूप हिंडल्या .तमाशातील काम करत असतानाच त्यांनी कोल्हाटी समाजासाठी घरे मिळवून देण्यासाठी धडपड केली .रसिकांना मायबाप मानून उपाशीपोटी अविरत कलेची साधना त्यांनी केली. अनेक सन्मान त्यांना मिळाले. अडीचणींचे अनंत डोंगर पार करत रात्ररात्र कलेसाठी समर्पित करून त्यांनी आपले संघर्षमय जीवन व्यतीत केले .तमाशा कलावंत विठाबाई नारायणगावकर यांनीही वयाच्या दहाव्या वर्षी स्टेजवर प्रवेश करून आपल्या कलासाधनेचा प्रारंभ केला.गाण्याची मनस्वी

आवड यातून त्यांची कला उत्तरोत्तर बहरत गेली .लावणी आणि तमाशावरील त्यांची श्रद्धा प्रतिकूल परिस्थितीत ढळली नाही .तमाशा आणि संसार एकाच वेळी चालू होते .सातव्या मुलाच्यावेळी त्यांना स्टेजवरच कळा सुरू झाल्या .तेव्हा न डगमगता स्टेजच्या मागे जाऊन मुलाला जन्म देऊन त्याची नाळ दगडाने तोडून त्या पुन्हा नाचायला स्टेजवर आल्या .

'पोटातल्या जिवाच्या पोटासाठी आणि माझ्याही पोटासाठी मला नाचलंच पाहिजे.'२असं म्हणत त्या नाचत राहिल्या.कलावंतांच्या ठायी असलेली ही कलानिष्ठा ,परिस्थितीशी दोन हात करत जिद्द,चिकाटीने केलेला जीवनप्रवास वाचकांस स्तिमित करतो .टी. एन.परदेशी यांनी या लेखांचे शब्दांकन केले आहे .

लावणी साम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांनीही बालपणी नाच गाणे सुरू केले होते.हिंदी सिनेमात गायची त्यांना संधी मिळाली. भजनं, अभंग, भावगीतं गाजल्यानंतर त्यांनी लावणीचे रेकॉर्ड काढले.वेगवेगळ्या संगीतकारांकडे त्यांनी गाणी गायली.प्रेक्षकांकडून प्रेम मिळाले.गृहिणी, पत्नी आणि आईपण सांभाळून त्यांच्या साडेतीन-चार हजार रात्री गाण्यात गेल्या .समाजऋणातून उतराई होण्यासाठी त्यांनी समाजसेवेसाठी खास कार्यक्रम केले .एका सच्च्या कलावंताने सामान्य गोरगरिबांच्या आयुष्यात गाण्यांनी काही क्षण मंतरुन टाकले.गाण्यांनी रात्री सुगंधित केल्या .हेच कलावंतांचे देणे.त्यांनी भरभरून दिले. कलाकार म्हणून आपल्या आयुष्यात आलेल्या बऱ्यावाईट अनुभवांचा पट माया जाधव यांनी उलगडला आहे.वयाच्या चौथ्या वर्षी रंगमंचावर त्यांचा पहिला प्रवेश झाला. पुढे ऑर्केस्ट्राच्या निमित्ताने त्यांनी जगभर प्रवास केला .त्या काळात कोल्हापूरात रस्त्यावरून सायकल चालवणारी पहिली मुलगी म्हणजे माया जाधव.कला सर्व दुःखांना विसरायला लावते असे म्हणत त्यांनी संगीत नाटकातही काम केले .चित्रपट नृत्य दिग्दर्शन, व्यावसायिक कार्यक्रम,स्वतःचा काढलेला ऑर्केस्ट्रा, लोकनाट्यात केलेले काम असा उत्तरोत्तर यशाचा चढता आलेख त्यांच्या आयुष्यात पहायला मिळतो .कलेसाठी वाहिलेल्या रात्री संपूच नयेत असे त्यांना वाटते .लोकनाट्य, तमाशा,लावणी यातून बदलत गेलेला आयुष्याचा प्रवास सुरेखा पुणेकर यांनी सांगितला आहे.सात-आठ वर्षांची असताना त्यांनी तमाशात गाणे म्हणायला सुरुवात केली .पुढे 'सुरेखा पुणेकर आणि पार्टी ' असा फड चालू केला. नाटक,आकाशवाणी, लावणी महोत्सवात त्यांना संधी मिळाली.
त्यांनी खास महिलांसाठी ' लेडीज शो ' केले.ते खूप लोकप्रिय झाले .शाळेत न जाताही आयुष्याच्या शाळेत शिकून सामाजिक बांधिलकी जपत केलेले त्यांचे कार्य मोठे आहे .

तमाशा कलावंत काळू-बाळू ज्यांची नावे लहू-अंकुश होती त्यांनीही पाचवीनंतर तमाशात काम करायला सुरुवात केली .सोंगडे म्हणून महाराष्ट्राला परिचित असलेल्या काळू-बाळूने गोवा,दिल्ली,हैदराबाद याठिकाणीही आपले खेळ केले.तेव्हा तमाशाला उतरती कळा लागली होती. या कलेला त्यांनी उर्जितावस्था प्राप्त करून दिली .फडात काम करताना आलेले बरेवाईट अनुभव त्यांनी सांगितले आहेत. टी. व्ही.मुळे ही 'गावरान कला ' मेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे .

नाटककार प्रभाकर पणशीकर यांनी नाटकाशी एकरूपलेल्या उत्तररात्री उलगडल्या आहेत .नाटकाच्या वेडापायी त्यांनी घरदार सोडले. मुंबईच्या फुटपाथवरुन सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास फिरत्या रंगमंचावर येऊन स्थिरावतो.फिरत्या रंगमंचावरील पहिला प्रयोग कोल्हापूर येथे करून त्यांनी लोकांच्या मनात कुतूहल जागवले. 'The show must go on' या तत्त्वानुसार वडिलांचे अंत्यदर्शन घेऊन ते नाटकासाठी पंढरपूरला गेले .आयुष्यातील दहा हजार रात्री नाटकासाठी दिल्याचे ते सांगतात .वैयक्तिक दुःखाला धीराने सामोरे जाऊन कलेप्रती जीवन समर्पित करणारे,नाटकाला उर्जितावस्था प्राप्त करून देणारे प्रभाकर पणशीकर नाटककार,कलावंत म्हणून श्रेष्ठ वाटतात.असेच दुःख बाबमहाराज सातारकर यांच्या वाट्याला आले .मुलगा गेल्याच्या दुःखाला सामोरे जात त्यांनी आपली कीर्तनपरंपरा अखंड चालू ठेवली .लोककल्याणासाठी कीर्तन

करून लोकांचे जीवन सात्त्विक, समृद्ध करण्यासाठी ते धडपडले .रात्रीच्या वेळी कीर्तन चालू असताना एकदा वादळ चालू झाले.त्यांनी लोकांना मांडवाचे खांब धरून बसायला सांगितले. दोन अडीच तास ते कीर्तनाचे रंगले.मंडपाबाहेर सगळे पडताच पुन्हा वादळ सुरू होते आणि मंडप कोसळतो. अशा थरारक प्रसंगातून निभावून त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात परिवर्तनाचे विचार पेरले.कीर्तनात रंगलेल्या रात्रींचा जागर कथनातून उलगडतो .

वयाच्या ८८व्या वर्षी आपल्या हृदयात गाणं चैतन्याने नांदत आहे असे सांगणाऱ्या गंगुबाई हानगल यांनी वयाच्या तेराव्या वर्षी गायला सुरुवात केली .वेगवेगळे राग शिकल्यानंतर अमेरिका, फ्रान्स, कॅनडा मधील मैफिलींच्या आठवणीतून त्यांचे सांगितिक आयुष्य उलगडले आहे .स्वतःचे व इतरांचे आयुष्य संगिताने आनंदून टाकल्याचे समाधान त्यांना वाटते.वेगवेगळ्या कलावंतांनी आपल्या कलेसाठी समर्पित केलेले आयुष्य या आत्मकथनातून उजागर होते .रसिकांना देव मानून आपल्या कलेप्रती प्रामाणिक राहून कलानंद देणारे कलावंत रात्रींशी झगडून,उपाशीपोटी राहून सर्वसामान्य जनतेसाठी कलेची जोपासना करतात. हा 'रात्र'प्रवास 'रंगल्या रात्री ' या पुस्तकात अरुण शेवते यांनी संपादित करून प्रकाशित केला आहे.तमाशा कलावंतांचे अनुभवविश्व या पुस्तकात आहे .

**रात्रीचे आत्मचरित्र**

'उमराव जान 'अदा' या लघुकादंबरीत उमराव जान या नायकिणीने तिचा जीवनप्रवास कथन केला आहे .१५० वर्षांपूर्वी

'उमराव जान' ने आपल्या नृत्याने आणि शायरीने लखनौचा माहौल

गाजवून सोडला होता.तिचे आयुष्य म्हणजे रात्रीचे आत्मचरित्र होय.नृत्य ,गाणे आणि रात्र एकमेकांत मिसळून तिचे आयुष्य घडवीत गेले.कलावंतीणीची अस्वस्थ करणारी रात्रीची कहाणी ती सांगते.मिर्झा हादी रुस्वा या उर्दू कवीची आणि तिची भेट झाल्यावर तिने आपला जीवनसंघर्ष त्याला सांगितला.तिच्या प्रत्येक रात्रीच्या आठवणीतून कोठीवरचे जग ,तिच्या जगण्याचे पैलू उलगडतात. तिच्या जीवनावरचा उमराव जान चित्रपट तिचे जगणे रेखाटतो .लघुकादंबरीचा अनुवाद विजय पाडळकर यांनी केला आहे.

**रात्ररंग**

कवी,शायर,गीतकार गुलजार यांनी 'रात्र'या पार्श्वभूमीवर पहिले चित्रपट गीत लिहिले.'मोरा गोरा अंग लई ले, मोहें शाम रंग दई दे' या गाण्याची जन्मकथा, सचिनदा आणि गुलजार यांचे मस्त जमलेले ट्युनिंग ,चित्रपटातील कल्याणीची मानसिक स्थिती ओळखून गाण्यात गुंफलेले सुंदर शब्द वाचून वाचक मंत्रमुग्ध होतात. रात्रीपासून सुरू झालेला त्यांचा गाण्याचा अफलातून प्रवास रात्र आणि चंद्र या प्रतिमांचा शोध घेत आजही चालू आहे .तसेच एकदा हिमालयातील प्रवासातील आलेला सुंदर रात्रीचा प्रवासही त्यांनी रेखाटला आहे .हिमालयात एकीकडे बर्फाच्छादित आणि दुसरीकडे हिरवीगार झाडे पाहत केलेला प्रवास त्यांना आठवतो.त्या प्रवासातील खूप थंडी असलेल्या रात्री कोळशावर ब्रँडीचे थेंब टाकत निरखलेली निळसर ज्योत गुलजार यांना डायमंडसारखी दिसली.त्या रात्रीचे नितांतसुंदरपण त्यांनी मनात जपले आहे.अशाच अदभूत रात्रीचे अनुभव राणी दुर्वे यांनी सांगितले आहेत.आयुष्यातल्या पहिल्यावहिल्या बर्फवृष्टीचे अनोखे सौंदर्य ,लोणावळ्यातून राजमाची गावात चालत जाताना अवसेच्या रात्री काजव्यांनी उजळलेली सुंदर रात्र पाहून त्या रात्रीला त्या 'व्हाइट नाईट' संबोधतात. ज्या रात्रीनी भयावह अनुभव दिले

त्यांना 'ब्लू नाईट' असे म्हटले आहे .रात्रीची गूढता आणि सौंदर्य लेखिका संवेदनशीलतेने टिपते.

रात्रीचे सुखद आणि दुःखद अनुभव राधिका टिपरे यांनी रेखाटले आहेत .लहानपणी अनुभवलेली अनोखी रात्र ,नातेवाईकांच्या मृत्यूने अनुभवलेली वेदनांकित रात्र, त्यातून आयुष्याला कलाटणी मिळाल्याचे

त्या स्पष्ट करतात.निरभ्र आकाशात नक्षत्रांनी फुलून आलेल्या मैफिलीचा अनुभव,लहानपणी तारका न्याहाळत फुलांच्या सुगंधी झुळुकात घालवलेल्या रात्री, हर्णे बंदरवर अनुभवलेलं रात्रीचं समुद्राचे रौद्र रूप असे परस्परविरोधी रात्रींचे चित्रण राधिका टिपरे यांनी चित्रित केले आहे.विश्वास पाटील यांनी बालपणीच्या आणि चित्रनगरीतल्या आठवणींचा पट उलगडला आहे .गावजत्रेत अनुभवलेल्या लावणीच्या आठवणी,लोकशाहीराची झालेली ओळख,खळ्यावर जागलेली रात्र, रात्री डोंगरात केलेली भटकंती असे बहारदार रात्रींचे चित्रण त्यांनी केले आहे .रात्रीच्या अनुभवातून समृद्धता आल्याचे ते सांगतात .

लखनौमधील वास्तव्यास असताना अनुभवलेल्या रात्रींच्या अविस्मरणीय आठवणी अली सरदार जाफरी यांनी सांगितल्या आहेत .लखनौच्या गुलाबी थंडीत घालवलेली जेलमधील रात्र, भयाण वादळाच्या रात्री रंगलेली कवितांची मैफिल, मजाजच्या मृत्यूची भयाण रात्र अशा रात्रीच्या अनुभवांचे कथन त्यांनी केले आहे.राजकारणात रंगलेल्या रात्री यशवंतराव गडाख यांनी रेखाटल्या आहेत .राजकीय मसलती, कटकारस्थाने ,गुप्त खलबते यासाठी रात्री कशा वापरल्या जातात याचे गमतीशीर तसेच ताणतणाव देणाऱ्या रात्रींचे चित्र त्यांनी चितारले आहे .चित्रकार रमेश थोरात यांनी रात्रींच्या अनुभवांचे मनस्वी चित्रण केले आहे .बालपणापासून अंधाराची रात्रीची असलेली मोहिनी ,भटकंती करत असताना ऐकलेली पक्ष्याची काळीज हेलावणारी पल्लेदार आर्त शीळ ,मध्यरात्री पाहिलेली मुग्यांची रांग ,विमनस्क स्थितीत कलाकृती पूर्ण केल्यानंतर आलेली स्वस्थता चिंतनातून लेखक मांडतात. रात्रींशी खोलवर असलेले ऋणानुबंध लेखात उलगडतात.

टी. एन.परदेशी यांनी श्रीरामपूरच्या रेल्वे स्टेशनवर घालवलेल्या संघर्षमय रात्रींचे चित्रण केले आहे .रात्रींनी जीवनाचे खरे रूप दाखवले असे ते म्हणतात .रात्रीचे करुणेशी असलेले नाते त्यांनी स्पष्ट केले आहे .सुखदुःखाशी नाळ जोडणाऱ्या रात्री तसेच आई वडिलांच्या सहवासातील रात्री विद्याधर म्हैसकर यांनी मनस्वीपणे रेखाटल्या आहेत .अशोक राणे यांनी रात्रीचे थरारक जग शब्दांकित केले आहे .लहानपणी भुताची ओळख झाल्यानंतर वडिलांना आलेला भुताचा अनुभव,भुताचा भास हे मनातील आदिम भीतीचे प्रतीक असल्याचे ते स्पष्ट करतात .या भुतांचे अस्तित्व ते मानत नाहीत मात्र आसपास वावरणारी ,पाय सुलटे असणारी भुते मात्र अनुभवल्याचे ते सांगतात. बालपणातील चाळीतील सुंदर रात्री, आजोळच्या खेड्यातील रात्री,कोकणातील गूढ, अदभुत रात्री,जयपूरच्या हॉटेलमधील भीतीदायक रात्र,मुंबईत अनुभवलेली तरल रात्र अशा विविध रात्रींचा धांडोळा किशोर आरस यांनी घेतला आहे .रा.रं. बोराडे यांनी बालपणापासूनचे रात्रींचे अनुभव चितारले आहेत . सवंगडयांसोबत रात्रीचा तमाशा बघायला न जाताच मधून माघारी फिरल्याचा प्रसंग त्यांनी टिपला आहे .पाकिस्तान विरुद्ध हेरगिरी केल्याच्या आरोपावरून चौदा वर्षे सश्रम कारावासाची सजा भोगत असताना अनुभवलेल्या रात्रींचे कथन मोहनलाल भास्कर यांनी केले आहे .

**अरण्यरात्री**

ज्याने सारे आयुष्य जंगलातील वन्य पशुपक्ष्यांच्या अभ्यासात घालवले अशा डॉ.देवदत्त आणि आदिवासी ओंकरी यांची शोकात्म कहाणी मारुती चितमपल्ली यांनी रेखाटली आहे .अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतांच्या रागांमधील मेळघाटातील आदिवासींच्या सहवासात डॉ.देवदत्त अनेक रात्री व्यतीत करतात .शीघ्र कवयित्री ओंकरी सुंदर नृत्य करते,गाणी म्हणते.तिच्या गाण्यातील सौंदर्य लेखात उलगडते .चिपी तलावाकाठी रात्रीच्या अंधारात अनुभवलेली जंगल धून,निसर्गसौंदर्य याचे वर्णन केले आहे .लेखक देवदत्तच्या समाधीच्या सान्निध्यात एक रात्र घालवतात. त्या अंधारात सप्तसुर ऐकल्याचे ते सांगतात .बुद्धपौर्णिमेच्या रात्री नवेगाव राष्ट्रीय उद्यानात वन्यजीव पशुपक्षी यांच्या सहवासातील अनोखी 'अरण्यरात्र' सुरेशचंद्र वारघडे यांनी रेखाटली आहे .त्या रात्री रानपक्ष्यांचा संगीतोत्सव त्यांनी अनुभवला .पशुपक्ष्यांच्या सहजीवनातून खूप काही

**शिकण्यासारखे आहे,असा सूर या लेखातून उमटतो .अरण्यातील रात्रींचा हा कोलाज थरारक तितकाच रमणीय आहे .**

**मद्यधुंद रात्री**

**आयुष्याच्या कठीण प्रसंगात,एकटेपणाच्या वाटेवर दारूची आणि लेखकांची गट्टी जमली . दारूच्या संगतीत रमलेल्या रात्री,मित्रांसोबत जंगलात तंबूत राहून जागवलेल्या रात्री ,तेव्हा केलेले दारूचे अमर्याद सेवन लेखक रवींद्र कालिया अशा ' मद्यधुंद रात्री' चे अनुभव सांगतात . दारुच्या व्यसनामुळे मित्रांचा झालेला शेवट लेखकाला मृत्यूची जाणीव करून देतो. विषण्णतेने दारूने झालेली बरबादी लेखकाने मांडली आहे . महेश केळुसकर यांनीही दारू पिणाऱ्यांच्या रात्रीच्या आठवणी सांगितल्या आहेत .दारूच्या दुष्परिणामांनी कुटुंबाची झालेली वाताहत प्रसंगचित्रणातून रेखाटली आहे .दारूच्या सोबतच दुःखद रात्रींचा पट त्यांनी उलगडला आहे.**

**समारोप**

**कलावंतांच्या कलाविष्काराच्या रात्री कष्टप्रद तितक्याच कलेच्या बेहोष आनंदात रंगत जाणाऱ्या .सुखदुःख, हालअपेष्टा, संघर्षातून पार करत रात्रींनी त्यांच्या आयुष्यापुढे टाकलेले दान मनापासून स्वीकारत हे कलावंत कलेसाठी जगत आले .परिस्थितीशी झगडून आपली कला जिवंत ठेवताना त्यांनी कित्येक रात्रींना जागते ठेवले .तसेच रात्र भयानक,थरारक अनुभव देऊन जाते .रात्र सुखदुःखाशी नाळ जोडते . कीर्तनात रंगलेली रात्र,रेल्वे स्टेशनवरील रात्र,जंगलधून ऐकवणारी रात्र,सौंदर्याने खुललेली रात्र,चंद्र,चांदण्यासोबत गाणारी रात्र ,पक्ष्यांच्या सुरेल सुरातून आळवणारी रात्र,काजव्यासोबत चमचमणारी रात्र,सजग,समृद्ध करणारी रात्र अशा रात्रींच्या विविधांगी रूपांचे दर्शन 'ऋतुरंग'मधून वाचकांस घडते .रात्र या एकाच प्रहराचे मनोहर चित्रण मनास भुरळ पाडते. रात्रींचे विविध विभ्रम वाचताना जाणवणारी आणि जागवणारी रात्र आपल्या मनात रुणझुणत राहते . 'रात्ररंग' हे रात्रींच्या लेखांचे संपादन अरुण शेवते यांनी करून पुस्तक रुपात प्रकाशित करून हा ' रात्र नजराणा' जपून ठेवला आहे .**

**निष्कर्ष**

**१.कलावंतांच्या रात्री सर्वसामान्यांपेक्षा वेगळ्या असतात.अटळ संघर्ष, कष्ट,चिकाटी,कलानिष्ठा या पातळीवर त्या दृग्गोचर होताना दिसून येतात .**

**२.'रात्र' या एका प्रहराचे विविध पैलू वाचकांसमोर येतात .**

**३.रात्र विशेषांकातील लेखनातून वाचकांच्या अनुभवांचा पैस विस्तारला जातो .वाचकांच्या जाणीवा प्रगल्भ होतात .**

**४.रात्र हेच कलावंतांचे आयुष्य असल्याचे दिसून येते.**

**संदर्भ**

**१.शिंदें,रणधीर, 'पितृऋणाचा समृद्ध लेखनठेवा',फेसबुक वॉल, १०/०४/२०२०**

**२.नारायणगावकर,विठाबाई,'ऊनपावसाचा खेळ ',ऋतुरंग दिवाळी अंक,२००१,पृ.२५**